नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०७/२०२५ (शनिवार)**


## मा. श्री.चंद्रशेखर बावनकुळे, महसुल मंत्री तथा पालकमंत्री नागपूर जिल्हा यांनी घेतली नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांच्या कामकाजाची आढावा बैठक नागपुर ग्रामीण पोलीसांचे केले कौतुक


आज दिनांक २६/०७/२०२५ रोजी मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महसुल मंत्री तथा पालकमंत्री नागपूर जिल्हा यांनी पोलीस भवन नागपुर येथे नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांच्या कामकाजाबाबत आढावा बैठक घेतली. सदर बैठकीत मा. श्री. संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक ,नागपुर परीक्षेत्र , मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री विजय माहुलकर, पोलीस उपधिक्षक गृह, सर्व उपविभागिय अधिकारी आणि ईतर अधिकारी असे हजर होते.


**सणोत्सव बंदोबस्त/ उपाययोजनेंबाबत आढावा:—** मा. मंत्री महोदय यांनी आगामी येणाऱ्या जन्माष्टमी,गोपाळकाला,पोळा,गणेश,चतुर्थी(स्थापणा),अनंत चर्तुदशी (विर्सजन) या सणोत्सवाच्या कालावधीमध्ये कायदा व सुव्यवस्थेबाबत उपाययोजनेंचा आढावा घेतला. गणेश विसर्जनासाठीचे कृत्रिम तलावे याबाबतची सुध्दा माहीती देण्यात आली.

**अवैध धंदयावरील कारवाई बाबत आढावा :—** नागपुर ग्रामीण जिल्हा पोलसांनी केलेल्या अवैध धंदयाबाबत च्या कारवाई बाबत माहीती सादर करण्यात आली. सर्व कारवाई मध्ये सन २०२३ आणि २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. अंमली पदार्थांच्या च्या कारवाईत सन २०२३ मध्ये १०, सन २०२४ मध्ये ३२ तर सन २०२५ जुन पर्यंत ३४२ कारवाई करण्यात आलेल्या आहेत. रेती तस्करीच्या बाबतीत सन २०२३ मध्ये ७६ , सन २०२४ मध्ये २२१ तर सन २०२५ जुन पर्यंत २५० कारवाई करण्यात आलेल्या

आहेत. अवैध जनावर तस्करीच्या बाबतीत  सन २०२३ मध्ये ५७ , सन २०२४ मध्ये ७६ तर सन २०२५ जुन पर्यंत ८८ कारवाई करण्यात आलेल्या आहेत. जुगार बाबतीत सन २०२३ मध्ये ४१४ , सन २०२४ मध्ये ३९३ तर सन २०२५ जुन पर्यंत ४२८ कारवाई करण्यात आलेल्या आहेत. अवैध दारू बाबतीत  सन २०२३ मध्ये १७०० , सन २०२४ मध्ये १८९२ तर सन २०२५ जुन पर्यंत १९९४ कारवाई करण्यात आलेल्या आहेत. तसेच प्रतिबंधत्मक कारवाई उदा. एम.पी.डी.ए., मोक्का , हद्दपार प्रस्ताव या बाबत सुध्दा माहीती सदर केली.





अवैध धंदयांवरील कारवाई – वाळु
३००
२५०
२००
१५०
१००
५०
०
७६
२२१
२५०
वाळु
२०२३
२०२४
२०२५


अवैध धंदयांवरील कारवाई – जनावराची अवैध वाहतुक
100
90
80
70
60
50
40
30
20
10
0
57
76
88
जनावराची अवैध वाहतुक
2023
2024
2025



अवैध धंदयांवरील कारवाई – जुगार
440
430
420
410
400
390
380
370
414
393
428
जुगार
2023
2024
2025





अवैध धंदयांवरील कारवाई – दारूबंदी
2050
2000
1950
1900
1850
1800
1750
1700
1650
1600
1550
1700
1892
1994
दारूबंदी
2023
2024
2025

**प्रतिबंधक कारवाई**

| सन | MPDA | हद्दपार प्रस्ताव | MCOCA | PITA |
|---|---|---|---|---|
| २०२३ | ०६ | २३ | ० | ०६ |
| २०२४ | ०३ | ५३ | ० | ०५ |
| २०२५ | ०७ | ७२ | ०५ | ०८ |

**सेव लाईफ फाउंडेशन सोबत काम :—** नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस यांनी सेव लाईफ फाउंडेशन सोबत सामजंस्य करार करून अपघात आणि प्राणांतिक अपघात कमी करण्यासाठी वेगवेगळया उपाययोजना करत आहे. सदर आढावा बैठकीमध्ये मा.श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी नागपुर ग्रामीण जिल्हा चे अपघात आणि प्राणांतिक अपघात कमी करण्याचे प्रकल्पाचे "Nagpur Zero-Fatality District Programme" चे सादरीकरण केले. नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दला तर्फे जिल्हयातील ७ वेगवेगळया जागा जिथे सर्वात जास्त प्राणांतिक अपघाताचे प्रमाण होते तिथे रस्त्यामध्ये अभियांत्रिकी बदल केले गेले त्यामुळे तिथे प्राणांतिक अपघाताचे प्रमाण कमी झाले आहे. **जाने ते एप्रील २०२४ च्या तुलनेत जाने ते एप्रील २०२५ मध्ये प्राणांतिक अपघातचे प्रमाण १० टक्कयांनी तर अपघातचे प्रमाण ९ टक्कयांनी कमी झाले आहेत.**




**तपासमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा (AI) चा वापर :—** नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी MARVEL (Maharashtra Advanced Research and Vigilance for Enhanced Law Enforcement) अंतर्गत Crime OS या तंत्रज्ञानाचा तपासाची गती वाढवुन ,तपास काम शास्त्रोक्त, दर्जेदार होण्यासाठी तपासी अधिकारी यांना मदत होण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. यामध्ये सी.सी.टी.व्ही फुटेज विश्लेषण सुध्दा केले जाते. तसेच यामधील खालील पाच **(AI) आधारीत प्रगत टुल्स्ची रचाना व अंमलबजावणी करण्यात आली आहे.**

१. चेहरा ओळख प्रणाली (Facial Recognization)

२. वस्तु ओळख (Object Detection)

३. नंबर प्लेट ओळख (ANPR)

४. ऑप्टीकल कॅरेक्टर ओळख ( OCR),

५. सी.डी.आर/ टी.डी.आर विश्लेषणासाठी चॅटबॉट हे टुल्स् पोलीस यंत्रणेत प्रत्यक्ष वापरात आणण्यात आले आहे.

**मा. मंत्री मोहदय यांनी सर्व कामगिरी बाबत नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांचे कौतुक केले आणि अशीच कामगिरी करीत राहण्याबाबत सुचना दिल्या.**





## विदर्भातील वन्यजीव संरक्षणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा (AI) चा वापर MARVEL तर्फे राज्य शासनाचा पुढाकार

दिनांक २५/०७/२०२५ रोजी एका वृत्तपत्रात विदर्भातील वाघांवर एआय ची नजर , पण ई—निविदा न राबविता थेट कंत्राट या मथळया खाली बातमी प्रसिध्द झाली होती. वनविभागाने स्वाक्षरी केलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित वन्यजीव देखरेख प्रकल्पासाठी ई—निविदा का केले गेले नाही असा प्रश्न या बातमीत पडला होता, जो सध्या **MARVEL** द्वारे राबविला जात आहे. **MARVEL (Maharashtra Advanced Research and Vigilance for Enhanced Law Enforcement**) ही गृहविभागाअंतर्गत १६मार्च २०२४ रोजीच्या शासननिर्णया द्वारे स्थापन करण्यात आलेली, पुर्णपणे शासकीय मालकीची विशेष उद्देशवाहन (Special Purpose Vehicle) आहे. १ एप्रिल २०२५रोजीच्या मंत्रिमंडळ निर्णयाद्वारे, MARVELला मुख्य सचिव यांच्या अध्यक्षते खाली उच्चाधिकार समिती च्या (HPC) अधिपत्याखाली ठेवण्यात आले आणि राज्य शासनाच्या सर्व विभागांमध्ये AI संबंधित प्रकल्पांचे डिझाईन, अंमलबजावणी व समन्वय करण्यास प्राधान्य देण्यात आले.या निर्णया मागील प्रमुख कारण म्हणजे, शासकीय प्रकल्पांमधून निर्माण होणारा

संवेदनशील डेटा हा सार्वजनिक प्रणालीमध्येच सुरक्षित राहावा. MARVEL ही पूर्णपणे शासकीय मालकीची संस्था असल्यामुळे, अशा प्रकारचा डेटा केवळ महाराष्ट्र शासनाच्या कार्यप्रणालीत संशोधन व विकासासाठीच वापरण्यात येतो. १२ जुलै २०२५ रोजी, MARVEL आणि वनविभाग यांच्यात विदर्भातील वनक्षेत्राच्या भागांमध्ये ३,१५० AI सक्षम देखरेख कॅमेरे बसवण्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला. हा संपूर्ण उपक्रम मान्यता प्राप्त धोरणात्मक चौकटीत राबवण्यात येत आहे आणि सिद्ध तंत्रज्ञानाच्या माध्यमातून एक तातडीची गरज पूर्ण करण्याचा उद्देश त्यामागे आहे. या प्रकल्पामुळे वनक्षेत्रातील गावांमध्ये वन्यप्राण्यांची हालचाल वेळेत ओळखता येईल आणि तात्काळ इशारे देता येतील. यामुळे माणूस—वन्यप्राणी यांच्यातील संघर्षात लक्षणीय घट होण्याची अपेक्षा आहे. या उपक्रमाचा उद्देश स्थानिक नागरिकांचे संरक्षण आणि वन्यजीव संवर्धन हाच आहे.

## लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. रामटेक** :— फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन रामटेक येथे अप क्र. ४७२/२१ कलम ३६३, ३७६(३), ३७६(२) भादवि सहकलम ४,१६(३),१७ पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २७/१०/२०२१ चे संध्याकाळी ०४:०० वाजता यातील फिर्यादी हीची अल्पवयीन भाची ही दुकानात जाते असे सांगुन निघुन गेली परंतु संध्याकाळ पर्यंत ती घरी परत आली नाही.म्हणुन फिर्यादीच्या रिपोर्ट वरून कलम ३६३ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.त्यानंतर दिनांक २८/१०/२०२१ रोजी नमुद अल्पवयीन मुलगी मिळुन आल्यानंतर तिने तिच्या बयानात सांगितले की, **आरोपी नामे विजय प्रितम राठोड, २१ वर्षे, रा. नगरधन, रामटेक** याने पिडीत मुलगी ही अल्पवयीन आहे हे माहीत असतांना रामटेक येथील एका लॉज वर नेवुन तिचेवर लैंगिक अत्याचार केला. सहा. पोलीस निरीक्षक निशा भुते यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केले होते. सदरप्रकरणातमा. अतिरिक्तजिल्हा व सत्र न्यायाधीशश्री एस. ए. श्रीखंडे **(विशेष पोक्सो न्यायालय)** यांनी दिनांक २५/०७/२०२५ रोजी वरील नमुद आरोपीस सदर गुन्हयात कलम ३६६ भादंवि मध्ये ७ वर्षे सश्रम कारावास व ३,०००/— रूपये दंड, दंड न भरल्यास ३ वर्षे साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती विजया बालपांडे यांनी काम पाहीले. कोर्टकामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा/२२९ रोहीत मांडवगडे पो.स्टे. रामटेक यांनी मदत केली आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयात मोकाट जनावरांच्या मालकांवर दिनांक १९/०७/२०२५ ते २६/०७/२०२५ पर्यंत करण्यात आल्या ८० कारवाया

दिनांक २५/०७/२०२५ रोजी एका वृत्तपत्रात विदर्भातील राष्ट्रीय महामार्ग पर मवेशियोका जमावडा, हादसो का खतरा बढा या मथळया खाली बातमी प्रसिध्द झाली होती. दिनांक १९/०७/२०२५ ते दिनांक २६/०७/२०२५ रोजी पर्यंत नागपुर ग्रामीण जिल्हा अंतर्गत ज्या मलकाची जनावरे रस्त्यांवर मोकाट फिरत असतील अशा जनावरांच्या मालकांवर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १००,१०६,१०७ अन्वये **८० कारवाया करण्यात आल्या आहेत.**





## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६७३ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २६/०७/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६७३ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३६ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण १०२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २१ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी अशा एकुण १०७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १२० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३७ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापरखेडा येथे ३४ आरोपी अशा एकुण १०० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे ३१ आरोपी अशा एकुण ११३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.


**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ३७ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण १३१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन एकुण ६७३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**






पोलीस स्टेशन,रामटेक.





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने